**महाराष्ट्र शासन**

**क्र.मग्रारो २०१०/प्र.क्र. ७ /रोहयो १० अ**
नियोजन विभाग, मंत्रालय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २९ ऑगस्ट, २०११

**प्रति,**

**सर्व जिल्हाधिकारी,**
**सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विषयः-** ६ % प्रशासकीय निधीचा पुरेपूर वापर करुन कंत्राटी बाह्यस्थ मनुष्यबळ घेण्याबाबत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याबाबत शासन परिपत्रक दि. १६ डिसेंबर, २०१० द्वारे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. या बाह्यस्थ मनुष्यबळासाठी मानधन व अन्य खर्च ६ % प्रशासकीय निधीमधून करावयाची तरतुद आहे. तथापि अद्यापही बऱ्याच जिल्ह्यात पुरेशा प्रमाणात कंत्राटी मनुष्यबळ नियुक्त करण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. ६ % प्रशासकीय निधी उपलब्ध असूनही त्यातून कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यास वाव असतानाही जिल्ह्यात कंत्राटी कर्मचारी नियुक्त न केल्यास कामावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

मग्रारोहयो अंतर्गत झालेल्या कामाच्या ६ % प्रशासकीय निधी प्रत्येक जिल्ह्याला उपलब्ध होते. मात्र हा ६ % प्रशासकीय निधी पूर्णपणे खर्च होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही जिल्ह्यात सध्या ६ % प्रशासकीय निधी कमी असला तरी पुढील काळात ऑक्टोबर २०११ पासून कामे मोठया प्रमाणात सुरु करावयाची आहेत. त्यामुळे खर्चात वाढ होणार असून पर्यायाने प्रशासकीय निधीतही वाढ होईल. हे लक्षात घेता जिल्ह्यात आवश्यकतेप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्यात जेणेकरून त्यांचेद्वारे मोठया प्रमाणावर कामे सुरू करता येतील. प्रत्येक तालुक्यात आवश्यकतेप्रमाणे कंत्राटी कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे. सध्या या नियुक्तीमुळे काही जिल्ह्यात ६ % पेक्षा अधिक निधी खर्च होईल तथापि सदर अधिकचा खर्च ३१ मार्च, २०१२ अखेर पर्यंतच्या एकूण खर्चात वाढ झाल्यास त्यातून पूर्ण होऊ शकतो. तसेच राज्य स्तरावरुन सदर अधिकचा खर्च समायोजित करण्याबाबत विचार करण्यात येईल. दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील जिल्ह्यांनी  कंत्राटी बाह्यस्थ मनुष्यबळ त्वरीत नियुक्त करण्याबाबत प्राध्यान्याने कार्यवाही करावी.

२१ जुलै, २०११ रोजी ठाणे येथे आयोजीत करण्यात आलेल्या आढावा बैठकीत राज्य स्तरावरुन करार करुन केंद्रिय पध्दतीने एकाच एजन्सीमार्फत मनुष्यबळ पुरविण्याबाबत चर्चा करण्यात आली. परंतू यासाठी काही अवधी लागेल. मात्र तोपर्यंत आपल्या जिल्ह्यात आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया थांबवू नये. आपल्याकडे उपलब्ध असलेला ६ % प्रशासकीय निधी व भविष्यात आपल्या जिल्ह्यातील होणाऱ्या कामांच्या अनुषंगाने उपलब्ध होणारा ६ % निधी विचारात घेऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या तातडीने कराव्यात. कंत्राटी कर्मचाऱ्यांअभावी कामे सुरु होण्यात अडचणी निर्माण होणार नाहीत याची कृपया दक्षता घ्यावी.

(व्ही. गिरीराज)
प्रधान सचिव